# आद्यक्रांतीवीर उमाजी नाईकांचा राजकीय स्वातंत्र्यलढा

**प्रा. श्रीमती संध्या जयसिंग माने,** राज्यशास्त्र विभाग,
चंद्राबाई शांताप्पा शेंडूरे कॉलेज, हुपरी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर, sandhyamanesmk@gmail.com

---

**प्रस्तावना :** भारताच्या सामाजिक आणि राजकीय चळवळीमध्ये पुरोगामी महाराष्ट्राने नेहमी पुढाकार घेतला आहे. महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक चळवळींना फार मोठा वारसा आहे. महाराष्ट्रातील सामाजिक राजकीय चळवळींमध्ये वरिष्ठ जातीच्या योगदानाबरोबर भटक्या-विमुक्त समाजातीलही थोर वीरांचा सहभाग महत्त्वाचा आहे. प्रामुख्याने इंग्रजी राजवटीमध्ये इंग्रजांच्या अत्याचारी, अन्यायी कायदा व प्रशासनव्यवस्थेमध्ये समाजातील कनिष्ठ, भटका वर्ग फार भरडला गेला, त्याला स्वत:च्या अस्तित्वासाठी, अर्थार्जनासाठी इंग्रजांशी त्यांच्या ताकदीप्रमाणे लढावे लागले. मात्र त्यांनी केलेले हे बंड, लढा इतिहासाच्या, संशोधनाच्या पानावर मात्र दुर्लक्षित राहिला. याच अर्थाने भटक्या समजल्या जाणाऱ्या रामोशी समाजाने इंग्रजांविरुध्द दिलेल्या लढ्याला स्वातंत्र्ययुध्दाचे स्वरुप न देता त्यांना गुन्हेगार समजून त्यांचा हा लढा चोर, दरोडेखोर या स्वरुपात समाजमानसात बघितला गेला आणि इंग्रजांनी 1871 च्या गुन्हेगार कायद्याने तर यांना स्वातंत्र्यापूर्वीच नव्हे तर स्वातंत्र्योत्तर कालखंडात काही काळ बंदिस्त जीवन जगावे लागले. त्यांचा जीवन जगण्याचा, स्वातंत्र्याचा, अधिकाराचा, समानतेचा हक्क कायद्याने इंग्रजांनी हिरावून घेतला होता व यासाठीच रामोशी समाजातील आद्य क्रांतीवीर उमाजी नाईकांनी जो स्वातंत्र्य लढा लढला त्यांची मांडणी या शोध निबंधात करण्यात आली आहे.

**उद्दिष्टे :**

1.राजकीय चळवळीची संकल्पना अभ्यासणे.

2.उमाजी नाईकांचा राजकीय स्वातंत्र्यलढा अभ्यासणे.

**गृहितक :**

1. उमाजी नाईकांचे बंड हे स्वातंत्र्यलढ्याशी निगडीत होते.

**विषय मांडणी :**

**राजकीय चळवळीची संकल्पना :**

'चळवळ' ही सामुहिक कृती असते. यात अनेक लोकांचा सक्रिय सहभाग अपेक्षित असतो. एखाद्या प्रश्नाच्या निराकरणासाठी लोक जेव्हा संघटीत होऊन सातत्याने कृती करतात, तेव्हा तिला चळवळ असे म्हणतात. लोकांच्या विशिष्ट सार्वजनिक प्रश्नाभोवती निर्माण झालेल्या संघटनेतून चळवळ उभा राहत असते.

राजकीय व्यवस्थेत जनतेकडून केल्या गेलेल्या सर्वच मागण्या पूर्ण होतातच असे नाही किंवा कोणत्याही मागण्या एकदम मान्य होत नाहीत. त्यासाठी मात्र जनतेकडून विरोधी भूमिका घेतली जाते. सनदशीर मार्गाचा अवलंब करीत मागण्यांचा रेटा व्यवस्थित सुरु ठेवण्यासाठी प्रसंगी राजकीय पक्ष व दबावगटाच्या हस्तक्षेपामुळे मागण्यांना राजकीय चळवळीचे स्वरुप प्राप्त होते. तेव्हा मोर्चे, आंदोलने, संप, हरताळ, बंद अशा माध्यमांतून राजकीय चळवळ उभी केली जाते. मानवी जीवन जगत असताना प्रत्येक व्यक्तीला तिला स्वातंत्र्य, समता, न्याय या व्यक्तिमत्त विकसित गोष्टी समाजाकडून, सत्तेकडून मिळणे अपेक्षित असते. मात्र या अधिकारांवर समाज किंवा राजकीय व्यवस्थेकडून ज्यावेळी अन्याय, अत्याचार होतो त्यावेळी संबंधित व्यक्ती, व्यक्तीसमुह हा या विरुध्द आवाज उठवितो व आपले अधिकार प्राप्त करण्याच्या दृष्टीने बंड, लढा किंवा चळवळ उभा करताना दिसते. प्रस्तुत संशोधन लेखातही अशाच प्रकारे महाराष्ट्रातील डोंगर-दऱ्यात राहणाऱ्या रामोशी समाजावर इंग्रजांनी केलेल्या अन्यायाविरुध्द आणि स्वातंत्र्य, समता व न्याय यासाठी लढणाऱ्या रामोशी समाजातील आद्य क्रांतीवीर उमाजी नाईकांची राजकीय स्वातंत्र्य लढ्याची मांडणी करण्यात आली आहे.

**आद्य क्रांतीवीर उमाजी नाईक यांचा राजकीय स्वातंत्र्यलढा :**

इंग्रजांनी 1818 मध्ये पेशवाई नामशेष करून एक-एक करत अनेक भारतीय राज्ये ब्रिटीशांनी ताब्यात घेऊन साम्राज्यविस्तार केला. पेशवाईकालीन प्रशासनव्यवस्था, न्यायव्यवस्था, अर्थव्यवस्था या सर्वांची दुरावस्था झाली होती.

याचा फायदा इंग्रजांनी घेतला. जंगल संपत्ती, समुद्र यापासून ते इथं राहणाऱ्या समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या अधिकारांवर, स्वातंत्र्यावर इंग्रजी राजवट आपली हुकुमत गाजवू लागली. याचा परिणाम म्हणजे सन 1857 मध्ये ब्रिटीश राजवटीविरुध्द मोठा उठाव झाला. बारा बलुतेदारी पध्दत संपुष्टात येऊन तिचे स्वरुप बदलले. इंग्रजी राजवटीविरुध्द अनेक जमाती उपजिविकेसाठी प्रशासनाविरुध्द कायद्याविरुध्द बंड पुकारू लागले, गुन्हेगारीकडे वळू लागले. यास प्रतिबंध करण्यासाठी व आपल्या सत्तेला या जमातीकडून असणारा धोका ओळखून इंग्रजांनी 1871 साली 'गुन्हेगार जमात कायद' देशात संमत केला. या कायद्यानुसार ज्या जातींना गुन्हेगार म्हणून कायद्याने ठरविण्यात आले, त्यांचे जीवन बंदिस्त झाले. त्यांना तीन तारेच्या कुंपनात जीवन व्यथित करावं लागत होते. गुन्हा करो अथवा न करो, तीन तारेच्या कुंपनात जन्म-मृत्यू या गोष्टी घडत होत्या. गुन्हेगारी जमाती कायद्यामुळे या जमातींकडे गुन्हेगार म्हणून पाहू जाऊ लागले होते. यातीलच एक महत्त्वाची गुन्हेगार जमात म्हणजे 'रामोशी' होय.

वास्तविक रामोशी समाज हा स्वतंत्र बाण्याने, धाडसीपणाने जगणरा समाज. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेत आणि कारभारात या रामोशी समाजाचा सहभाग होता. गावाच्या संरक्षणाची जबाबदारी सांभाळणारे, प्राणाची पर्वा न करता स्वराज्यासाठी काम करणारे असे स्वराज्यरक्षक रामोशी समाजातील लोक होते. या मोबदल्यात त्यांना काही जमिनी इनाम म्हणून देण्यात आल्या होत्या. नाईक ही पदवी त्यांना देण्यात आली होती. त्यांच्या उदरनिर्वाहाची व्यवस्था करण्यात आली होती. मात्र अगोदर पेशवाई नंतर इंग्रज यांनी या रामोशी समाजाच्या इनामी जमिनी, किल्ले संरक्षणाची, गाव संरक्षणाची कामे काढून घेतली. इंग्रजी जंगली, सागरी कायद्यांमुळे, प्रशासकीय अत्याचारामुळे त्यांचा उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला. पर्याय काही नसल्यामुळे चोरी, दरोडेखोरी ते करू लागले. मात्र छत्रपती शिवाजी महाराजांच्या कथा, कहाणी ऐकून लहानाचे मोठे झालेले उमाजी नाईक यांना या चोरी, दरोडेखोरीत जगण्याचा अर्थ सापडेना. त्यांनी इंग्रज हे परकीय आहेत, आपण इथले मुलनिवासी आहोत, त्यामुळे इंग्रजांना इथून हकलवून देऊन छत्रपती शिवाजी महाराजांप्रमाणे आपले स्वराज्य इथे स्थापन झाले पाहिजे या भूमिकेतून ते कार्यरत झाले.

उमाजींचा कार्यकाल हा साधारण 1791 ते 1832 एवढा होता. चोरी, दरोडेखोरी अशा उदरनिर्वाहाच्या निमित्ताने सुरू केलेल्या उद्योगाचे स्वरुप बदलून त्यांनी नंतर आपले हे धोरण स्वराज्य प्राप्तीच्या दृष्टीने सुरु केले. इंग्रजांची परकीय सत्ता उध्वस्त करुन छत्रपती शिवाजी महाराजांप्रमाणे स्वत:चे स्वराज्य उभा करण्याच्या हेतूने त्यांनी स्वत:च्या प्राणाची आहुती दिली. उमाजी नाईकांच्या या स्वातंत्र्यलढ्याचा अभ्यास करताना इथ एक नमूद करावे वाटते की, अनेक संस्थानिकांनी इंग्रजांचे मांडलिकत्व स्वीकारून स्वत:चे अस्तित्व संपुष्टात आणले होते. त्यामुळे स्वाभाविकच समाजातील सर्वसामान्य जनता इंग्रजांच्या प्रशासन व कायद्याच्या दहशतीमुळे घाबरुन गेली होती. परंतु या दहशतीस बळी न पडता या परकीय इंग्रजांच्या राजकीय सत्तेस उलथवून टाकण्याचे धाडस, प्रयत्न उमाजी नाईक यांनी केला.

इंग्रजांविरुध्द बंड करताना माहिती गोळा करताना सांकेतिक भाषांचा वापर करणे, गुप्त सांकेतिक भाषेचा वापर करणे, वेगवेगळ्या पशु-पक्षींचा आवाज काढून संकेत इशारे देणे, खोट्या बातम्या पसरविणे, लपून-छपून हल्ला तसेच अचानक गनिमी पध्दतीने इंग्रजांवर हल्ला करणे, शस्त्रास्त्रे, युध्द-साधने चांगली तयार करून, त्याचे प्रशिक्षण सहकाऱ्यांना देणे, इंग्रजांविरुध्द लढा देताना, योजना तयार करताना आपल्या सर्व सहकाऱ्यांसमवेत त्यांना विश्वासात घेऊन चर्चा-मसलत करणे, नियोजन करणे अशा पध्दतीने इंग्रजांविरुध्द राजकीय लढा देताना उमाजी नाईकांनी आपली कार्यप्रणाली आखली होती व त्याप्रमाणे ते कार्य करत होते. खंडणी (महसूल) वसूल करणे हा स्वराज्यातील राज्यकर्त्यांचा अधिकार मात्र इंग्रजी राजवट हा महसूल गोळा करत असल्याने ही खंडणी इंग्रज सरकारला देऊ नये यासाठी उमाजींनी फार मोठा लढा उभा केला. याबाबत इंग्रजी राजवटीला तुमचा हा अधिकार येत नाही असे सुनावले तर जे खंडणी देणारे आहेत त्यांना काहीवेळा सहकार्याने तर काहीवेळा दम देऊन खंडणी गोळा करून ती आर्थिक दृष्टीकोनातून राजकीय बंडासाठी वापरलेली दिसून येते.

उमाजींच्या या जनतेकडून सारा वसूल करण्याच्या भूमिके विरुध्द इंग्रज राजवट खडबडून जागी झाली. मात्र उमाजी हे प्रतिसरकारप्रमाणे जनतेवर अधिकार गाजवित होते. ते स्वत:ला "स्वयंघोषित राजाच" म्हणू लागले. लोक त्यांना राजाप्रमाणे मान देत. कॅप्टन डेव्हिसन ता. 27 नोव्हेंबर 1827 ला कॅप्टन रॉबर्टसन यांस लिहिलेल्या पत्रात उमाजी राजांच्या दरबाराविषयी माहिती दिली होती. उमाजी राजे अधिकाराने आपल्या सहकाऱ्यांसमवेत राजपध्दतीने काम करू लागले होते. शक्य तेवढ्या दरबारी थाटात उमाजीराजेंचा दरबार भरत असे. त्यांनी हेर खाते निर्माण करून त्यांची प्रमुख

कामे व विभाग आपल्या सहकाऱ्यांना विस्तारीत केली होती. स्वराज्य निर्मिती करण्याची त्यांची प्रेरणा जिज्ञासा, कार्य यावरून लक्षात येते.

उमाजीराजे यांनी सर्व प्रजेने इंग्रजांविरुध्द उठाव करावा असे आवाहन केले होते. स्वत:स राजा घोषित करून स्वतंत्र सरकारचा प्रमुख या नात्याने त्यांनी आपला जाहीरनामा जनतेसमोर दि. 16 फेब्रुवारी 1831 रोजी मांडला होता. हा जाहिरनामा इंग्रजांच्या विरोधातील स्वातंत्रलढ्याचे इतिहासातले पहिले सुस्पष्ट घोषणापत्रच होते. हा जाहिरनामा पुढील प्रमाणे :

1.सर्व राजे, जहागीरदार, सरदार आणि इतर सर्व लोकांनी जे जे इंग्रज युरोपियन भेटतील त्यांची हत्या करावी.

2.नवीन स्थापन होणारे सरकार वरील हत्याकांडांत प्रमुखप्रणे भाग घेणाऱ्या लोकास जहागिरी, इनामे व रोख बक्षिसे देईल.

3.ज्यांची वंशपरंपरागत वतने, हक्क नष्ट केले गेले असतील अशा लोकांस, विशेषकरून कळविण्यात येते की, त्यांनी अशा प्रसंगी आम्हांस मदत केली असता; त्यांची गेलेली वतने, हक्क व बंद केलेली तनखे हे नवीन सरकार पुन्हा त्यांना बहाल करील.

4.भारतातील सर्व रहिवाशंनी सर्वत्र एकदम उठाव करून, सर्व देशात गोंधळ व अराजकता माजेल, अशी दंगल उडवून द्यावी.

5.जे या देशांतील रहिवासी आहेत त्या ब्रिटीश पायदळातील सैनिकांनी व घोड दलांतील स्वारांनी सर्व युरोपियन अधिकाऱ्यांवरील निष्टा टाकून देऊन, त्यांची धरपकड करावी. या जाहिरनाम्याविरुध्द वर्तन करणाऱ्यास नवीन सरकार योग्य ते कडक शासन करील.

6.सर्व युरोपियन लोकांची मालमत्ता लुटावी अथवा नाश करावी. त्यांचे सर्व खजिने लुटावेत. अशा लुटीत, त्या लुटीचा ज्याला जो हिस्सा मिळेल तो त्याने स्वत:च्या मालकीचा समजून स्वत:जवळ ठेवावा. त्याबद्दल त्याला कोणत्याही प्रकारचा जाब विचारला जाणार नाही.

7.हल्ली जी खेडी जमिनीचा शेतसारा इंग्रजांना देतात, तो लोकांनी तत्काळ बंद करावे. या हुकुमाविरुध्द वर्तन करणाऱ्या खेड्यांना बेचिराख केले जाईल.

8.जे हिंदू किंवा मुसलमान या जाहिरमान्याविरुध्द वागतील ते आपण होऊन आपल्यावर मोठे संकट, दैवी आपत्ती ओढवून घेतील.

9.(शास्त्रात असा आधार निघालेला आहे की) असे भविष्य वर्तवण्यात आले आहे की, इंग्रजांचे राज्य नष्ट होण्याची वेळ समीप आली आहे. ते सर्व लोक या देशातून लवकरच निघून जातील व नवीन न्यायी राज्याची स्थापना होईल.

**उमाजींच्या जाहिरनाम्याची वैशिष्टे :**

1. एक राष्ट्र ही संकल्पना उमाजींच्या जाहिरनाम्यातून स्पष्ट होते. कारण त्यांनी हा जाहिरनामा हिंदूस्थानच्या सर्व रहिवाशांना, जनतेस समोर ठेवून काढलेला होता.

2. इंग्रजांचे राज्य संपुष्टात आणून नवे न्यायाधिष्ठीत स्वकीय राज्याची निर्मिती केली पाहिजे, अशी भूमिका त्यांच्या जाहिरनाम्यातून व्यक्त होताना दिसते.

3. हा जाहिरनामा समाजातील सर्व स्तरातील सर्व घटकांना जाती-धर्मातील लोकांना सामावून घेणारा असा होता.

4. उमाजी कायद्यासमोर सर्वांना समान लेखतात. हिंदू किंवा मुसलमान कोणत्याही जाती-धर्माच्या व्यक्ती असो तो जाहिरनाम्याविराधात वागेल तर आपल्यावर मोठे संकट आढवून घेतले जाईल असे स्पष्ट सांगतात. थोडक्यात जाहिरनाम्याविरोधात कोणीही वागत असेल तर उमाजी त्याची गय करणार नाही, असे स्पष्ट करतात. यावरुन उमाजी सर्व जाती-धर्माच्या लोकांना स्वकीय राज्याबाबत जागरूक करताना दिसतात.

5. ज्यांची वंशपरंपरागत वतने, हक्क नष्ट झाली आहेत, ज्यांच्यावर अत्याचार झाला आहे, अशा लोकांनी उमाजींस सहकार्य करावे, अशी भूमिका ते व्यक्त करतात. त्यांना त्यांची गेलेली वतने, हक्क नवीन स्वकीय सरकार पुन्हा देईल ही न्यायाची हमी ते या जाहिरनाम्याद्वारे देतात.

उमाजींचा हा इंग्रजाविरुध्दचा जाहिरनामा हा स्वातंत्र्य, समता, न्याय यांच्या प्राप्तीसाठी होता. स्वकीय राजवट निर्माण करून इंग्रजांची परकीय राजवट हाकलवून देण्यासाठी होता. एकंदरीतच त्यांचा हा जाहिरनामा राजकीय-सामाजिक स्वातंत्र्यप्राप्तीसाठी होता. उमाजी नाईकांचा राजकीय अंगाने विचार करता त्यांचे हे कार्य स्वातंत्र्य, समता,

न्याय या तत्त्वांवर अधिष्ठीत असलेले दिसून येते. अलिकडील राजकारणांशी तुलना करता त्यांचे राजकीय व्यक्तिमत्त्वाच्या वेगवेगळ्या पैलू फारच कौतुकास्पद वाटतात. युध्दतंत्राचे डावपेच त्यांना अवगत होते, योजना पार पाडण्यासाठी, माहिती प्राप्त करण्यासाठी लागणारी सांकेतिक भाषा, बहुरूपी सोंगे, पशु-पक्षींचे आवाज ही वारसारुपाने त्यांना कौशल्य लाभली होती. राज्यनिर्मिती करण्यासाठी आवश्यक संघटन कौशल्य व नेतृत्वधारकता त्यांच्याजवळ होती. उमाजींना ज्यावेळी पहिल्यांदा अटक करण्यात आली, त्यावेळी तुरुंगात असताना त्यांनी तिथल्या तुरुंग अधिकाऱ्यांकडे लिहीता वाचता येण्याची ईच्छा व्यक्त केली. शिक्षणाचे महत्त्व ओळखून ते अल्पप्रमाणात का होईना साक्षर झाले. उमाजींचे चारित्र्य निष्कलंक होते. बहुपत्नीत्वाची पध्दती असूनही ते एकपत्नीव्रता राहिले. त्यांच्या टोळीतील साथीदारांनाही त्यांनी स्त्रियांशी गैरवर्तन करायचे नाही असा सज्जन व कडक दम दिला होता. सामान्य व्यक्तीपासून ते राजे-सरदारांपर्यंत दारु पिणे ही गोष्ट त्यावेळी हौसेची, मजेची, सवयीची होती. पण डोंगर दऱ्यात वावरणारे उमाजी नाईकांनी दारुमुळे होणारे लक्षात घेऊन नंतर ते शेवटपर्यंत दारुपासून लांब राहिले. उमाजींना कसल्याही प्रकारचा सत्ता व संपत्तीचा मोह नव्हता. राजे-सरदार आपआपसात सत्ता, संपत्तीसाठी एकमेकांत युध्द खेळत होते, स्वकीयांशी गद्दारी करुन इंग्रजांशी हातमिळवणी करते होते. अशावेळी उमाजींनी बंड पुकारले. ते स्वकीयांसाठी चोरी-दरोडे यातून मिळालेली संपत्ती ते स्वातंत्र्यलढ्यासाठी वापरत. त्याचबरोबर टोळीतील साथीदारांच्या उदरनिर्वाहासाठी त्यांना वाटत असत. गरजू लोकांना मदत करणे, भट-ब्राम्हणांना दान-दक्षिणा देणे, बैरागी, गोसावींना काही ना काही देणे, जेजूरी तसेच इतर मंदिरात दान देणे, दक्षिणा देणे अशा प्रकारे उमाजींचे व्यक्तिमत्त्व हे निस्वार्थी व दानशूर दिसते. उमाजींच्या टोळीत व त्यांनी इंग्रजांविरुध्द काढलेल्या जाहिरनाम्यात समाजातील सर्व स्तरातील, जाती-धर्मातील सहभाग आढळता. स्वराज्याच्या ध्येयप्राप्तीसाठी त्यांनी सर्वांना एकत्र घेऊन कार्य केलेले दिसते.

**निष्कर्ष :**

उमाजींनी राजकीय नेतृत्वाद्वारे स्वराज्यप्राप्ती करून इंग्रज सरकारला इथून हाकलवून देऊन शिवाजी महाराजांप्रमाणे इथं स्वराज्य स्थापन करण्याची आस बाळगली होती. डोंगरदऱ्यात, जंगल-कपाऱ्यात वावरणारे मात्र स्वत:चेच नव्हे तर संस्थानिकांपासून सर्वसामान्यांपर्यंत गेलेले अधिकार, हक्क, सत्ता पुन्हा प्राप्त करण्यासाठी या अडाणी, अशिक्षित माणसाने स्वत:च्या प्राणांचीसुध्दा पर्वा केली नाही. उमाजींचे वैर ब्रिटीशांशी होते. त्यांच्या गुन्हेगारी वृत्तीशी होते. ब्रिटीशांना घालवून, स्वराज्य स्थापण्याच्या त्यांचा संकल्प होता. मात्र उमाजींचे हे बंड मोडून काढण्यासाठी इंग्रजांनी फार कसोशीने प्रयत्न केले पण यश आले नाही. उघड युध्द करून उमाजी सापडणे अशक्य असल्याने आर्थिक प्रलोभन दाखवून मोठ्या फितुरीने इंग्रजांनी उमाजींस पकडले. व उमाजींचे हे राजकीय बंड थांबले. उमाजींना देशद्रोही ठरवून त्यांना दि. 3 फेब्रुवारी 1832 रोजी पुणे इथे फाशी देण्यात आली. त्यांच्या या बंडाची इंग्रजांनी इतकी धास्ती घेतली होती की, फाशी दिल्यानंतर त्यांचे प्रेत तीन दिवस झाडाला लटकवून ठेवले होते की जेणेकरून पुन्हा असे बंड समाजमानसामध्ये कोणी करण्याचे धाडस करू नये. एकूणच पहाता उमाजी नाईकांनी ब्रिटीशांविरोधात जो लढा दिला, त्यावरून त्यांचे स्वत:च्या स्वराज्याप्रती असणारी राष्ट्रनिष्ठेची भूमिका स्पष्ट होते. उमाजींना विश्वासघाताने अटक केल्यानंतर फाशी देण्यापर्वी ज्यांनी उमाजींना अटक केली त्या कॅप्टन मॅकिन्टॉश यांनी उमाजी कैदेत असताना त्यांच्याशी संवाद साधून “An Account of the Origin and Present Condition of the Tribe of Ramoossies, Including the Real Life of the Chief Oommiah Naik” हे पुस्तक लिहीले. या महत्त्वाच्या दस्तावरून लक्षात येते की, उमाजी नाईकांचा हा राजकीय लढा स्वातंत्र्य, समता, न्याय या तत्त्वांवर अधिष्ठीत होता. इंग्रजांविरुध्द जनतेसाठी उमाजींनी 1831 साली पहिला जाहिरनामा प्रसिध्द केला व राजकीय स्वातंत्र्यलढा उभा करून स्वराज्य निर्मितीचे स्वप्न पाहिले म्हणून त्यांच्या या बंडाचा आढावा घेता त्यांना “आद्य क्रांतीवीर” उमाजी नाईक म्हणून गौरविले जाते.

**संदर्भ :**

1. Mackintosh, ‘An Account of the Origin and Present Condition of the Tribe of Ramoossies, Including the Real Life of the Chief Oommiah Naik’, Bombay:American Mission Press, 1833.
2. आठवले सदाशिव, ‘उमाजीराजे, मुक्काम डोंगर’, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, 1991.
3. डॉ. पोतदार माधव, ‘महाराष्ट्रातील लढे आणि लढवय्ये’, अनुबंध प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, 25 जून 2006.
4. डॉ. भोळे भास्कर लक्ष्मण, ‘राजकीय सिध्दांत आणि विश्लेषण’, पिंपळापुरे बुक डिस्ट्रि ब्युटर्स, नागपूर, 2006.